MHTH170005182022

**नियमीत दिवाणी दावा क्र.२५/२०२२**

**कृष्णा पुजारी व इतर वि. काशीनाथ गोरेकर व इतर**

**आदेश निशाणी क्र.०५ आदेश**

(दिनांक ०५/०८/२०२३)

-----------------------------------------

वादींनी प्रतिवादीं क्र. १ ते ३ विरुध्द हा अर्ज अंतरिम मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे व प्रतिवादीं क्र. १ ते ३ ने दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकतीवरील कब्जास, लागवडीस व उपभोगस कोणताही हरकत अथवा अडथळा करु नये व दावा मिळकतीत प्रवेश करु नये असा मनाई आदेश मिळावा अशी विनंती केली.

**०२.** मौजे परनाळी, ता.जि. पालघर येथील गट नं. ६२/४ क्षेत्र ०-८३-० हे.आर ही जमीन या दाव्याचा विषय असून (यानंतर **वाद मिळकत** असा उल्लेख) वादातील आहे.

**०३.** वादींच्या व प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ च्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी आपल्या कथनाप्रमाणे (म्हणजेच वादींतर्फे दावा नि.क्र.०१ मधील व नि.क्र.०५ मधील कथनाप्रमाणे प्रतिवादीं क्र. ०१ ते ०३ तर्फे नि.क्र. १४ वरील लेखी कैफियतील कथनाप्रमाणे) आणि पटलावरील कागदपत्रांप्रमाणे युक्तीवाद केला.

**०४.** पटलावरील उपलब्ध कथनावरुन माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | वादींनी त्यांची केस प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय ? | - होय. |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | - होय. |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | - होय. |
| ४ | आदेश काय ? | -अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०५.** वादींनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ पटलावर दस्ताऐवज यादी नि.क्र.०३ कागदपत्रे दाखल केलेले आहेत. तर प्रतिवादींनी पटलावर यादी नि.क्र. १६ वर दोन यादयायवरील एकूण ०५ कागदपत्रे दाखल केले आहेत.

**मुद्या क्र.०१ ते ०४ करीता :-**

**०६.** वरील तिन्ही मुद्ये एकमेकांशी संबंधीत असल्याने त्यांचा एकत्रीतरित्या विचार करण्यात येतो.

**०७.** वादींचे असे कथन आहे की, ते कै. मनूबाई शिनवार पूजारी हिचे वारस आहेत. वाद मिळकत ही त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष कब्जात व लागवडीखाली आहे. वाद मिळकत ही वादींचे आजोबा कै. बारकू लाडक्या गोरेकर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीत होती. त्यांना इंदूमती हरिचंद्र हाडळ व मनूबाई शिनवार पूजारी अशा दोन मुली वारस होत्या. बारकू याने सन १९८३ साली वर्दी अर्ज देवून दावा मिळकतीवर इंदूमती व मनूबाई यांचे नावाची नोंद १/३ हिश्याकरीता करुन घेतली व १/३ हिस्सा आपल्याकडे ठेवला. त्याबाबत फेरफार क्र. ११३७ मंजूर झाला. बारक्या हे दि. १२/१/१९९५ रोजी मयत झाले. त्यानंतर वाद मिळकत ही मनूबाई व इंदूमती यांचे प्रत्यक्ष कब्जात मालक म्हणून आल्या. मनूबाई ही दि. १७/९/२०१५ रोजी मयत झाली. तिचे मृत्यूपश्चात वाद मिळकत वादींचे ताब्यात आली. आजमितीस वाद मिळकत वादींचे प्रत्यक्ष कब्जात व लागवडीखाली आहे. मनूबाई हिने तिचे हयातीत वाद मिळकतीची सन २०१४ मध्ये तालुका भुमी अभिलेख पालघर यांचे कार्यालयाकडून मो.र.नं. ६१५२/२०१४ अन्वये मोजणी करुन घेतली. त्यामुळे वाद मिळकत तिचेच ताब्यात असल्याचे निर्वीवादपणे सिध्द झालेले आहे.

**०८.** वादींचे पूढे असेही कथन आहे की, वाद मिळकतीत अन्य कुणाचा कुठल्याही प्रकारे हक्क संबंध नसतांना दि. १७/६/२०१९ रोजी वादी क्र. ३ लागवडीचे दृष्टीने बांधबंदिस्ती करीत असतांना प्रतिवादी अनंत याने त्याचे संरपच पदाचा गैरवापर करुन वाद मिळकतीवर वादी क्र. ३ ला शिवीगाळी करु लागला व यावर्षी तुम्ही जमीन लागवड करायची नाही, नाहीतर परिणाम वाईट होतील, जमीन आम्ही लागवड करणार व तुम्ही हरकत केली तर तुम्हांला जीवे ठार मारु अशी धमकी दिली. संबंधीत कृत्याबाबत वादी नं. ३ ने त्यावेळी संबंधीत अधिका-याकडे तक्रारी अर्ज केला. संबंधीत अधिका-याने तोंडी समज दिल्याने प्रतिवादी शांत राहिले. परंतू दि. १८/१२/२०२१ रोजी पून्हा वादी

क्र. ३ घरी असतांना प्रतिवादी तेथे आले व दावा मिळकत ही आमची आहे. दावा मिळकतीवर पाय ठेवला तर कानफड फोडून टाकू, तंगड तोडून टाकू, तुमचे दिवस भरले आहेत अशी धमकी देवून शिवीगाळ करु लागले. वादी क्र. ३ घाबरल्याने त्वरीत पोलीस स्टेशनला गेला नाही. दि. २१/१२/२०२१ रोजी प्रतिवादींविरुध्द तारापूर पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हा क्र. १६१/२०२१ नोंदविला. परंतू पोलिसांनी प्रतिवादींविरुध्द कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे त्यांची हिम्मत वाढली आहे. त्यामुळे प्रस्तूतच्या अर्ज दाखल केला आहे व तो मंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

**०९.** प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे लेखी कैफियत नि.क्र. १४ दाखल करण्यात आली व नमूद करण्यात आले की, दाव्यातील सर्व मजकूर खोटा व चुकीचा आहे व त्यांना तो मान्य नाही. दाव्यामध्ये नमूद केलेल्या चतूःसिमेतील जमीन वाद मिळकत ही वादींच्या ताब्यात नाही व ती आपल्या ताब्यातील आहे असे त्यांचे मुख्य कथन आहे. वादींनी प्रस्तूत दावा हा फक्त मनाई हुकूमाकरीता दाखल केला आहे. दाव्यास आवश्यक पक्षकाराची बाधा येते व मुदतीच्या कायदयाची बाधा येते. जमीन सर्वे नं. ५१/१ क्षेत्र ०–५७–०० हे.आर, सर्वे नं. ५९/२ क्षेत्र ०–०९–०० हे.आर, सर्वे नं. ५९/५ क्षेत्र ०–५७–७० हे.आर आणि सर्वे नं. ६०/५ क्षेत्र ०–१७–२० हे.आर या जमीनीपैकी भाग बळकावण्यासाठी व त्यास सर्वे नं. ६२/४ चा भाग दर्शविणेकामी खोटी व बिनबुडाची कथने केलेली आहे. वादी व प्रतिवादीं हे एकमेंकाचे नातेवाईक आहेत. प्रतिवादीं हे सर्वे नं. ६२/४ चे लगतचे कब्जेदार असल्यामुळे वादी हे हद्दीबाबत वाद निर्माण करीत आहेत व प्रतिवादी व इतरांची जमीन हडप करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादी व इतर यांनी वाद मिळकत श्री. सतेज दत्तात्रेय चूरी यांना लीजवर दिलेली होती व त्यावर सिमला मिरचीची लागवड सुमारे ७ वर्षाचे प्रदिर्घ कालावधीसाठी केलेली होती व आजवर सदर प्रतिवादी व इतर सहमालक हेच लीजवर लागवड व वहिवाट करीत आहेत. जरी कागदोपत्री मोजणी दाखविली असेल तरी ती बेकायदेशीर व प्रतिवादींवर बंधनकारक नाही. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. तसेच दाव्याचे योग्य मुल्यांकन करुन रास्त कोर्ट फी स्टॅम्प दिलेले नाही. अशाप्रकारे प्रतिवादींनी वादींच्या अर्जाला विरोध केला व वादींनी दावयात नमूद केलेल्या चतूःसिमेतील मिळकत आपल्या ताब्यात आहे असे कथन करुन हा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

**१०.** तात्पूरता मनाई हुकूमाचा अर्ज निकाली काढतांना वाद जमीनीची मालकी आणि ताबा या दोन्ही बाबीं बारकाईने पडताळयाव्या लागतात. वादींचे दाव्यात व अर्जात

असे कथन आहे की, वाद मिळकतीचे म्हणजेच गट नं. ६२/४ क्षेत्र ०–८३–० हे.आर या जमीनीचे ते मालक आहेत, कारण त्यांना ती जमीन आपल्या आईकडून वारसाने मिळालेली आहे. मान्यता, प्रतिवादींनी आपल्या लेखी कैफियतीमध्ये वादींच्या या गटातील तेवढया क्षेत्रफळाच्या मालकीबद्दल कोठेही स्पष्टपणे नाकारले नाही. दुसरी बाब अशी की, वादींतर्फे पटलावर यादी नि.क्र. ३ वर काही कागदपत्रे दाखल करण्यात आली. त्यातील दस्त क्र. १ हा ७/१२ उतारा आहे व त्यावरुन असे दिसते की, सन २०१९–२०२० ते २०२१–२०२२ या दरम्यान ही जमीन भोगवटदार म्हणून वादींचे नावे आहे. त्याबरोबरच दस्त क्र.२ हा फेरफार क्र.१६९ ची प्रत आहे व त्यावरुन असे दिसते की, बारकू लाडक्या गोरेकर म्हणजेच वादींचे आजोबा मरण पावल्यानंतर बारकूच्या मुली इंदूमती आणि मनूबाई या दोघींचे नावे वारसाची नोंद म्हणून या जमीनीवर नावे आलेले आहेत. म्हणजेच या क्षणी या महसूल नोंदीवरुन असे दिसते की, गट नं. ६२/४ क्षेत्र ०–८३–० हे.आर ही जमीन वादींचे नावे आहे व ती त्यांना वारसाहक्काने मिळालेली आहे ही बाब वादींनी प्रथमदर्शनी दाखवून दिलेली आहे. मान्यता, या नोंदीना कायदेशीर गृहितक आहे व त्यामुळे हे गृहितक खोडेपर्यत त्या नोंदीना महत्व आहे.

**११**. वाद मिळकतीच्या बाबतीत मालकीच्याबाबतीत वरील परिच्छेदामध्ये प्रथमदर्शनी ओहापोह झालेला आहे. त्यामुळे आता त्या जमीनीवर ताबा कुणाचा आहे आणि तो कसा व केव्हापासून आहे ही बाब पडताळावी लागेल. कारण दाव्यातील नमूद चतूःसिमेतील जमीन ही वादींचया ताब्यात नाही व ती आपल्या ताब्यात आहे असे प्रतिवादींचे कथन आहे व बचाव आहे. दुसरी बाब अशी की, त्या चतूःसिमेतील जमीन आपल्या ताब्यात आहे असे वादींचे कथन आहे.

**१२.** दाव्यातील नमूद चतूःसिमेतील जमीनीवर आपला ताबा आहे हे दाखविण्यासाठी वादींनी पटलावर ७/१२ उतारा यादी नि.क्र. ३ सोबत दाखल केला आहे. यातील नोंदीवरुन असे दिसते की, सन २०१९–२०२० ते २०२१–२०२२ या दरम्यान भोगवटदार म्हणून गट क्र. ६२/४ मधील ०–८३–०० हे.आर जमीनीवर वादींची नोंद आहे. तसेच असेही दिसते की, या जमीनीमध्ये सन २०१९–२०२० मध्ये काही भागात भात व काही भागात गवताचे पिक त्यांनी घेतल्याची नोंद आहे. तसेच असेही दिसते की, सन २०२१–२०२२ मध्ये ती जमीन बीनशेती पड आहे. म्हणजेच या ७/!२ उता–याचे नोंदीवरुन या क्षणी प्रथमदर्शनी असे दिसते की, गट नं. ६२/४ मधील ८३ गुंठे जमीन सन २०१९–२०२० व २०२१–२०२२ या दरम्यान वादींच्या ताब्यात होती हे

वादींनी दाखवून दिलेले आहे. मान्यता, या जमीनीवर प्रतिवादींचा ताबा होता किंवा त्यांनी त्यामध्ये वहिती केली व पिक घेतले होते असे या क्षणी दिसत नाही.

**१३.** दाव्यातील नमूद चतूःसिमेतील जमीनीवर आपल्या आईचा ताबा होता हे दाखविण्यासाठी वादींतर्फे पटलावर यादी नि.क्र. ३ वरील दस्त क्र. ३ आणि ४ ही त्या जमीनीची हद्द कायम मोजणी करण्यासाठीची नोटीस व मोजणीची प्रत दाखल केली. यातील दि. १९/३/२०१४ रोजीच्या नोटीस प्रतीवरुन असे दिसते की, वादींची आई मनूबाई हिने अर्ज केल्यावरुन गट नं. ६२/२ आणि ६२/४ या जमीनीच्या मोजणी साठी नोटीस काढण्यात आली होती व लगत धारक म्हणून सखुबाई गोपीनाथ पिंपळे, विवेक गंगाधर संखे, जितेंद्र दत्तात्रेय चूरी आणि रमीबाई रामा गोरेकर यांना नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या. तसेच असेही दितसे की, मनूबाईने त्यासाठी मोजणी फी भरली होती. त्याबरोबरच मोजणीच्या नकाशावरुन असे दिसते की, ती मोजणी दि. १३/५/२०१४ रोजी सर्वे नं. ६२/२ व ६२/४ च्या बाबतीत करण्यात आली होती.

**१४.** वादीच्या दाव्यातील नमूद चतूःसिमेतील जमीनीचे अवलोकन केले असे असता असे दिसते की, पूर्वेला सखुबाई गोपिनाथ पिंपळे, पश्चीमेला रमीबाई रामा गोरेकर, उत्तरेला इंदूमती हरीशचंद्र हाडळ व दक्षीणेला जितेंद्र दत्तात्रेय चुरी यांची मिळकत असल्याचे वादींनी नमूद केले. या अनुषंगाने यादी नि.क्र. ३ वरील दस्त क्र. ३ मोजणी नोटीसीचे अवलोकन केले असता असे दिसते की, सखुबाई, हितेंद्र आणि रमाबाई यांना त्या नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या असे या क्षणी प्रथमदर्शनी दिसते. प्रतिवादींचे वकीलांचे आपल्या युक्तीवादादरम्यान असे कथन आहे की, रमीबाई ही मयत आहे व वादींनी वाद जमीनीचे चतूःसिमेमध्ये तिचे नाव टाकले आहे व ती नोटीस मयताला सुध्दा दिली होती असे दिसते. माझ्या मते सदरचा युक्तीवाद या क्षणी प्रतिवादींना मदत करु शकत नाही. कारण रमीबाई नेमकी कधी मरण पावती याबद्दलची तारीख प्रतिवादींनी आपली लेखी कैफीयत नि.क्र. १७ मध्ये कोठेही नमूद केली नाही किंवा तसे मृत्यूप्रमाणपत्र पटलावर दाखल केले नाही. या अनुषंगाने प्रतिवादींतर्फे दाखल करण्यात आलेल्या यादी नि.क्र.१६ वरील एकूण चार ७/१२ उता–यातील नोंदीवरुन आणि गाव नमूना नं. ८ अ च्या उता–यावरुन या क्षणी असे दिसते की, गट क्र. ५१/१, ५९/२, ५९/५ आणि ६०/५ या सर्व जमीनीवर आजही रमीबाई रामा गोरेकर व इतर तिघांचे नावे नमूद आहेत. त्यामुळे वादींनी पश्चीमेच्या चतूःसिमेमध्ये रमीबाईचे टाकलेले नाव चुकीचे आहे असे या क्षणी दिसत नाही.

**१५**. वादींने दाखल केलेल्या यादी नि.क्र. ३ वरील दस्त क्र. ४ या मोजणी नकाशाचे प्रतीवरुन असे दिसते की, सर्वे नं. ६२/४ च्या पश्चीमेला सर्वे नं.५९ व ५९/३ आणि ६०/२ या जमीनी आहेत. मान्यता, प्रतिवादींनी यादी नि.क्र. १६ वर दाखल केलेल्या ७/१२ उता–यावरुन गाव नमुना नं. ८ अ च्या उता–यावरुन असे दिसते की, जमीन गट क्र. ५१/१, ५९/२ ५९/५ आणि ६०/५ या चार जमीनी रमीबाई, प्रतिवादी क्र. १ काशीनाथ आणि इतर दोघांच्या नावे आहेत. मान्यता, या मोजणी नकाशावरुन असे दिसते की, या चार जमीनी गट क्र.६२/४ आणि गट क्र.६२/२ च्या कोणत्याही दिशेला नाहीत. म्हणजेच वादींच्या दोन्ही जमीनींच्या कोणत्याही दिशेला प्रतिवादींच्या जमीनी आहेत हे या क्षणी प्रथमदर्शनी पुरावा असू शकत नाही. मान्यता, मोजणी नकाशा हा ताब्याबाबत अचूक असा पुरावा असू शकत नाही. पण माझ्यामते या मोजणी नकाशावरुन या क्षणी असे नक्कीच म्हणता येईल की, हा मोजणी नकाशा आहे व या क्षणी यातील मजकूराला चतूःसिमेच्या बाबतीत व चारही बाजूला कोणत्या जमीनी आहे हे पाहण्यापूरते नक्कीच महत्व आहे असे म्हटल्यास न्यायाची बाजू सांभाळली जावू शकते. कारण प्रतिवादींचे आपल्या लेखी कैफीयतीमध्ये असेच कथन आहे की, दाव्यात नमूद असलेल्या चतूःसिमेतील जमीन ही वादींच्या ताब्यात नसून आपल्या ताब्यात आहे. पण प्रतिवादींनी तसे कोणतेही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्याबरोबरच वादींची जमीन ही वेगळी आहे व तिच्या चतूःसिमा वेगळया आहेत व चारही बाजूला कोण कोण आहे याबाबत काहीही खास/ठोस कथन केलेले नाही व तसा कागदोपत्री पूरावा दाखल केला नाही. मान्यता, वादींनीही चतूःसिमेच्या बाबतीत गटाच्या नकाशाची प्रत दाखल केली नाही. पण वादींनी दाखल केलेल्या मोजणीच्या नकाशावरुन या क्षणी तरी प्रथमदर्शनी गृहित धरता येईल की, त्यातील चतूःसिमेत प्रतिवादींची जमीन नाही. कारण या नकाशातील समजूतीच्या टिपामधील टिप क्र. १ मध्ये असे नमूद आहे की, मुळ अभिलेखानुसार सुध्दा तेथे हद्द पाहण्यात आली होती. म्हणून या क्षणी त्यास गृहितक आहे. मान्यता, अतिक्रमणाचे कथन वादींचेही नाही व प्रतिवादींचेही नाही.

**१६**. दाव्यातील नमूद चतूःसिमेतील जमीनीवर आपला ताबा आहे हे दाखविण्यासाठी प्रतिवादींतर्फे त्रयस्थ व्यकतींचा पूरावा म्हणून यादी नि.क्र.१६ वर साक्षीदार जयवंत लक्ष्मण पाटील यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. या साक्षीदाराचे असे म्हणणे आहे की, दाव्यातील नमूद चतूःसिमातील मिळकत ही प्रतिवादींच्या ताब्यात आहे व ते त्याला माहिती असल्याचे कारण म्हणजे त्यास लागून त्याची गट क्र. ६२१८ ही

जमीन आहे. या साक्षीदाराच्या शपथपत्राबाबत या क्षणी असे म्हणता येईल की, तो लगतचा शेतकरी आहे हे दाखविण्यासाठी प्रतिवादींतर्फे पटलावर तसा कोणताही गटाचा नकाशा दाखल नाही किंवा इतर संबंधीत कागदपत्रे दाखल नाहीत. त्यामुळे हा भाग साक्षीपूराव्याचा व संपरिक्षेचा आहे.

**१७.** प्रतिवादींच्या विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादात असे नमूद केले आहे की, वादींनी दाखल केलेला हा दावा फक्त मनाई हुकूमाचा आहे व तो कायदेशीर चालू शकत नाही. माझ्या मते या क्षणी हा युक्तीवाद प्रतिवादींना मदत करु शकत नाही. कारण गट क्र. ६२/४ या जमीनीचे वादी मालक नाहीत असे प्रतिवादींचे आपल्या कैफियतीमध्ये कोठेही कथन नाही किंवा वादींची ती मालकी प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारलेली नाही. त्यामुळे वादींचा हा दावा चालविण्याजोगा आहे हे या क्षणी म्हणावे लागेल व इतर बाबीं हा संपरिक्षेच्या व साक्षीपुराव्याचा भाग आहे.

**१८.** अशाप्रकारे एकंदरीतरित्या असे म्हणता येते की, वादींनी आपली केस प्रथमदर्शनी सिध्द केली आहे व अनुकुलतेचा कल त्याच्या बाजूने आहे. म्हणून वादींचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे अपिरीमीत नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण वादी हे प्रतिवादीं व इतर शेतक–यांची जमीन बळकावण्याच्या प्रयत्नात आहेत असे प्रतिवादींचे लेखी कैफियत नि.क्र.१४ मधील परिच्छेद क्र. ०५ मध्ये सदर कथन आहे व तो संपरिक्षेचा आणि साक्षीपूराव्याचा भाग आहे. येणेप्रमाणे मी मुद्या क्र.१ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी काढून मुद्या क्र.४ चा निष्कर्ष म्हणून खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज नि.क्र.५ मंजूर करण्यात येतो.

२. दाव्याचा निकाल लागेपावेतो प्रतिवादींनी स्वतः किंवा इतरांमार्फत वादींच्या वाद जमीनीतील कब्जास, लागवडीस व उपभोगस कोणतीही हरकत अथवा अडथळा करु नये व दावा मिळकतीत प्रवेश करु नये असा तात्पूरता मनाई हुकूम प्रतिवादींचे विरोधात देण्यात येतो.

SATISH YADAVRAO KADAM Digitally signed by SATISH YADAVRAO KADAM

**(सतीश या. कदम)**

दिनांक : ०५/०८/२०२३ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ.स्तर,

ठिकाण : पालघर. पालघर.